पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जड्ड डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर


# दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25


विश्वास पिढयान् पिढयांचा
काळे ज्वेलर्स
9601222777
9615222777
सोने | चांदी | हिरे | नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २३८ । किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | शुक्रवार ०२/१०/२०२६ । पान- ६

सिल्क फेस्टिव्हल
स्पर्श रेशमी सुखाचा
महोत्सव
सिल्क वस्त्रांचा
नामांकित ब्रँडस्च्या असंख्य व्हरायटीज्सह!
२० ऑगस्ट २०२६ पासून
मर्यादित कालावधीसाठी
१९५९ पासून
राजेन्द्र
विश्वासाची सार्थ परंपरा...
मेन रोड, संगमनेर.
फोन : ०२४२५-२२५७४०,
७९०१० ३११५५.

# हिवरगावात पावसाचा तडाखा

## माजी मंत्री थोरातांकडून नुकसानीची पाहणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -राज्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे अशा परिस्थितीमध्ये शेतकऱ्याला मदतीची अत्यंत गरज आहे. याचबरोबर अचानक आलेल्या पावसाने हिवरगाव पावसा येथे मोठे नुकसान झाले असून आता पंचनामे न करता या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याबरोबर राज्यातील सर्व शेतकऱ्यांना संकट काळात मदत करा अशी मागणी कॉंग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी केली आहे.

हिवरगाव पावसा येथे अचानक आलेल्या पावसाने शेडनेट कागद व घरांची मोठी नुकसान झाली या नुकसानीची मा. महसूल व कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांनी पाहणी केली यावेळी समवेत डॉ. प्रमोद पावशे, डॉ. संदीप पावशे यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते. काल अचानक आलेल्या पावसाने हिवरगाव पावसामध्ये शेतकऱ्यांच्या विविध पिकांसह शेडनेट कागद, घरांचे पत्रे व कौले यांची नुकसान झाले यामुळे आधीच आर्थिक अडचणी सापडलेल्या शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. या सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना कॉंग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी दिलासा दिला.

यावेळी ते म्हणाले की यावर्षी १९७२ पेक्षाही भयानक दुष्काळाची परिस्थिती निर्माण होऊ शकते. आता तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे कारण राज्यामध्ये पशुधन मोठे आहे. पाणी व्यवस्थापन केले पाहिजे. अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पंचनामे न करता तातडीने मदत दिली पाहिजे. दुष्काळग्रस्त सर्व शेतकऱ्यांना एकरी मदत देताना कोणत्याही पंचनामा नको सरसकट आणि मोठी मदत द्या जेणेकरून अशा संकट काळामध्ये शेतकरी उभा राहील. शेतकरी मोठ्या (पान ५ वर)

# आश्रमशाळांच्या अनुदानासाठी ३५ ते ४० लाखांची मागणी ?

## संस्थाचालकाचा सामाजिक न्याय मंत्र्यांच्या पीएवर गंभीर आरोप; चौकशीची मागणी



धाराशिव (वृत्तसंस्था)

आश्रमशाळांच्या अनुदानासाठी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या स्वीय सहाय्यकाकडून ३५ ते ४० लाख रुपयांची मागणी करण्यात आल्याचा गंभीर आरोप धाराशिव येथील आश्रमशाळा संस्थाचालक अरुण निटूरे यांनी केला आहे. यासंदर्भातील व्हिडिओ त्यांनी समाजमाध्यमांवर प्रसारित केला असून, मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी केली आहे.

निटूरे यांनी व्हिडिओमध्ये आश्रमशाळांचे अनुदान गेल्या २७ वर्षांपासून रखडल्याचा दावा केला. हजारो शिक्षक विनावेतन काम करत असून, अनेकजण दीर्घ सेवा करून विनापगारी निवृत्त झाल्याचेही त्यांनी म्हटले आहे. शासनाकडून निर्णय न झाल्याने संस्थाचालक व शिक्षकांवर गंभीर आर्थिक संकट ओढवले असल्याचा आरोप त्यांनी केला. (पान ३)

# कॅप्टन स्मित मच्छार यांचा शौर्याला जगाचा सलाम !



मुंबई- दुबईवरुन इस्त्रायलच्या तेल अवीवला जाणारे फ्लाय दुबईचे प्रवासी विमान क्रॅश होण्यापासून वाचवणारे भारतीय कॅप्टन स्मित मच्छार यांचे इस्त्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेत्यानाहू यांनी कौतुक केले आहे. भारतीय कॅप्टन स्मित मच्छार यांनी दाखवलेल्या अतुलनीय धैर्याबद्दल मी त्यांना सलाम करतो. शरीरात धारदार शस्त्र खुपसलं गेल्यामुळे गंभीररित्या जखमी होऊनही ते लढले, त्यांनी विरोध केला आणि विमानाच्या कॉकपीटचा दरवाजा उघडला. त्यामुळे प्रवाशी आणि विमानच्या क्रू ला मिळून हल्लेखोराला काबूत आणता आले. यामुळे एक मोठा अनर्थ टळला. कॅप्टन स्मित मच्छार यांनी इस्त्रायलच्या नागरिकांसह १७४ प्रवाशांचा जीव वाचवला. कॅप्टन स्मित मच्छार यांच्या प्रकृतीत वेगाने सुधारणा होवो. ते खरे नायक आहेत, अशा शब्दांत बिन्यामिन नेत्यानाहू यांनी त्यांचे कौतुक केले.

काल दुबईहून तेल अवीवला जाणारे प्रवासी विमान हायजॅक झाल्याचा संदेश नियंत्रण कक्षाला गेल्यानंतर जगभरात खळबळ उडाली होती. त्यावेळी विमानाच्या संरक्षणासाठी इस्त्रायली लढाऊ विमाने (फायटर जेट्स) देखील घटनास्थळी पोहोचली आणि विमानाला एस्कॉर्ट करून सौदी अरेबियाच्या विमानतळावर सुरक्षितपणे उतरवण्यात आले. त्यानंतर या साऱ्या प्रकाराचा उलगडा झाला होता. या विमानाचा ओमानचा को पायलट फ्लाय दुबईच्या विमानावर नियंत्रण मिळवून ते क्रॅश करण्याच्या तयारीत होता. मात्र, भारतीय पायलट स्मित मच्छार यानं ओमानच्या को पायलटचा प्रयत्न हाणून पाडला. यावेळी ओमानच्या वैमानिकाने कॅप्टन स्मित मच्छार यांच्यावर (पान २ वर)

Dist. 3234 D2
लायन्स क्लब संगमनेर सॅफ्रॉन सफायर
Happy to Serve Lions Club Sangamner Saffron Sapphire Dist. 3234 D2
लायन्स क्लब संगमनेर सॅफ्रॉन सफायर आपल्यासाठी
नवरात्र व दिवाळीचे औचित्य साधून घेऊन येत आहे!
सॅफ्रॉन शॉपिंग महोत्सव
वर्ष दुसरे
5 DAYS EXPO
शॉपिंगचा मनमुराद आनंद
FUN-FOOD & SHOP
शुक्रवार, शनिवार, रविवार, सोमवार, मंगळवार
2 3 4 5 6
OCTOBER 2026
ENTRY FREE
अतुल अभंग - प्रकल्प प्रमुख | कल्याण कासट - प्रकल्प प्रमुख | जितेश लोढा - अध्यक्ष व प्रकल्प प्रमुख | नम्रता अभंग - सचिव | चंद्रशेखर गाडे - खजिनदार
प्रकल्प समन्वयक : गिरीश मालपाणी, श्रीनिवास भंडारी, प्रफुल्ल खिंवसरा
मोफत प्रवेश
सकाळी 10 ते रात्री 9.30 वा. पर्यंत
मालपाणी लॉन्स, लक्ष्मी रोड, संगमनेर

।। भावपूर्ण श्रध्दांजली ।।



कळविण्यात अत्यंत वाईट वाटते कि आमच्या मातोश्री
कै.गं.भा.पार्वताबाई विठ्ठल कासार
यांचे बुधवार दि.२३/०९/२०२६ वृद्धपकाळाने निधन झाले असुन
यांचा दशक्रिविधी
शुक्रवार, दि. ०२ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८.०० वाजता
ठिकाण - निमज (अमरधाम), ता.संगमनेर
- शोकाकुल -
श्री. विवेक विठ्ठल कासार (मुलगा) | श्री. दिलीप विठ्ठल कासार (मुलगा)
सौ. मंगल विवेक कासार (सुन) | सौ. मंदाकिनी दिलीप कासार (सुन)
श्री. अमित दिलीप कासार (नातू) | श्री. अजित दिलीप कासार (नातू)
श्री. सौरभ विवेक कासार (नातू)
समस्त कासार परिवार व आप्तेष्ट
ह.भ.प. व्यंकटेश महाराज सोनवणे यांचे प्रवचन होईल.

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
- अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
- माफक दरात - संगमनेर येथेच
- 105 बेड्स
- तज्ञ डॉक्टर्स
- अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

# प्रकाश राठी यांची अहिल्यानगर जिल्हा बँक असोसिएशनच्या अध्यक्षपदी निवड



युवावार्ता (प्रतिनिध)

संगमनेर - सामाजिक, व्यावसायिक व बँकिंग क्षेत्रात सातत्याने सक्रिय राहून जनसंपर्काची वेगळी ओळख निर्माण करणारे प्रकाश सुरेश राठी यांची अहिल्यानगर जिल्हा बँक असोसिएशनच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.

प्रकाश राठी हे नागरिकांच्या आवर्जून संपर्कात राहणारे व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित आहेत. सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी राजकीय व सामाजिक क्षेत्रातही सक्रिय सहभाग नोंदविला आहे. स्वीकृत नगरसेवक ते संगमनेर मर्चंट बँकेचे संचालक, चेअरमन आणि आता जिल्हा बँक असोसिएशनचे अध्यक्ष, असा त्यांचा प्रवास लक्षवेधी ठरला आहे.

प्रकाश राठी यांचे वडील सुरेश दगडूराम राठी हे मूळचे चिंचपूर-आश्वी परिसरातील. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत ते संगमनेर येथे आले. येथे त्यांनी 'सुरेश सायकल स्टोअर' सुरू करून व्यवसायाची सुरुवात केली. पुढे जाजू परिवाराशी असलेल्या संबंधातून एस. जी. जाजू गॅस फर्ममध्ये त्यांनी भागीदारी केली. यानंतर प्रकाश राठी यांनी 'प्रकाश ऑटोमोबाईल्स' या नावाने स्पेअर पार्ट्सचा व्यवसाय सुरू केला. औपचारिक शिक्षण दहावीपर्यंत झाले असले तरी व्यवहारज्ञान, उत्कृष्ट स्मरणशक्ती आणि माणसे जोडण्याची हातोटी यांच्या जोरावर त्यांनी व्यवसायासोबतच सामाजिक व सहकार क्षेत्रातही आपले स्थान निर्माण केले. २००६ ते २०२३ या कालावधीत संगमनेर मर्चंट बँकेमध्ये संचालक म्हणून काम करताना त्यांनी पुढे चेअरमनपदाची जबाबदारीही सांभाळली. बँकिंग क्षेत्रातील या प्रदीर्घ अनुभवाच्या पार्श्वभूमीवर आता त्यांच्यावर अहिल्यानगर जिल्हा बँक असोसिएशनच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. प्रकाश राठी यांच्या या निवडीमुळे संगमनेरच्या सामाजिक व सहकार क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल घेतली गेल्याची भावना व्यक्त होत आहे.

# जमीन व्यवहारात मोठा बदल, आधार बंधनकारक



मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील जमीन आणि मालमत्ता खरेदी-विक्रीच्या व्यवहारांमधील वाढती फसवणूक, बोगस कागदपत्रे आणि खोट्या व्यक्तींना उभे करून होणारे गैरव्यवहार रोखण्यासाठी राज्य शासनाने अत्यंत कठोर आणि ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. राज्यात आता कोणत्याही प्रकारच्या दस्त नोंदणीसाठी आधार ओळखपत्र पूर्णपणे अनिवार्य (कंपलसरी) करण्यात आले आहे. १ ऑक्टोबरपासून हा नवा नियम संपूर्ण महाराष्ट्रात लागू करण्यात आला असून, यासंदर्भातील अधिकृत राजपत्र राज्य शासनाच्या वतीने प्रसिद्ध करण्यात आले आहे. या नव्या नियमामुळे खरेदीदार, विक्रेते अथवा साक्षीदारांकडे आधार ओळखपत्र नसल्यास त्यांची दस्त नोंदणी थेट नाकारली जाणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल प्रशासनात पारदर्शकता आणण्याच्या उद्देशाने हा धोरणात्मक निर्णय घेतला आहे.

राज्य सरकारच्या या निर्णयामुळे नोंदणी व मुद्रांक विभागाच्या कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल होणार आहेत. मालमत्ता खरेदी-विक्री, बक्षीसपत्र, गहाणखत , वाटणीपत्र लीव्ह अँड लायसन्स तसेच कुलमुखत्यारपत्र यांसारख्या तब्बल ६३ प्रकारच्या दस्तऐवजांच्या अधिकृत नोंदणीसाठी आधार पडताळणी बंधनकारक करण्यात आली आहे.केवळ व्यवहार करणारे मुख्य पक्षकारच नव्हे, तर दुय्यम निबंधक कार्यालयात दस्तावर स्वाक्षरी करणाऱ्या साक्षीदारांचीही अधिकृत आधार ओळख पटवणे आता सक्तीचे राहील.

गेल्या काही वर्षांत राज्याच्या विविध भागांत, विशेषतः महानगरांमध्ये आणि ग्रामीण पट्ट्यात मूळ मालकाच्या नकळत बनावट व्यक्तींना दुय्यम निबंधक कार्यालयात उभे करून जमिनी लाटण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणावर समोर आले होते. अनेक प्रकरणांमध्ये बनावट पॅनकार्ड किंवा खोटी ओळखपत्रे वापरून कोट्यवधींच्या जमिनींचे व्यवहार झाले आहेत. मात्र, आता बायोमेट्रिक आणि आधार जोडणीमुळे खरी व्यक्ती समोर असल्याशिवाय संगणकीय प्रणाली व्यवहार स्वीकारणार नाही.

न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या मालमत्ता फसवणुकीच्या आणि दिवाणी खटल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर बनावट साक्षीदारांचा समावेश असतो. या सक्तीमुळे खोटे साक्षीदार उभे करण्याचे प्रकार कायमचे बंद होणार असून, सर्वसामान्यांची आयुष्यभराची कमाई सुरक्षित राहण्यास मदत होईल.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गेल्या दोन वर्षांत डिजिटल फेरफार, ई-चावडी आणि जमिनींच्या दस्तऐवजीकरणात अनेक सुधारणा घडवून आणल्या आहेत. या नव्या निर्णयाबाबत बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, सामान्य नागरिकांची आणि शेतकऱ्यांची फसवणूक थांबवणे हेच शासनाचे सर्वोच्च प्राधान्य आहे.

# रब्बीच्या सहा पिकांच्या हमीभावात वाढ

## केंद्राकडून २.७९ लाख कोटींच्या प्रस्तावांना मंजुरी



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत शेतकरी, ऊर्जा क्षेत्र आणि दिल्लीतील वाहतूक व्यवस्थेशी संबंधित तीन महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. मार्केटिंग सीजन २०२७-२८ साठी रब्बी हंगामातील सहा पिकांच्या किमान आधारभूत किमतीत (चड्झ) वाढ करण्यास आर्थिक विषयांच्या मंत्रिमंडळ समितीने मंजुरी दिली. या निर्णयामुळे गहू, बार्ली, चणा, मसूर, मोहरी आणि करडई उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.

केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या उत्पादनाला योग्य दर मिळावा, या उद्देशाने रब्बी पिकांच्या हमीभावात वाढ केली आहे. यामध्ये करडईच्या चड्झ मध्ये सर्वाधिक ६७५ रुपये प्रति क्विंटल वाढ, तर गव्हाच्या चड्झ मध्ये २५ रुपये प्रति क्विंटल वाढ करण्यात आली आहे. इतर पिकांच्या हमीभावातही वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळाच्या निर्णयांची माहिती दिली. या निर्णयांमध्ये दीर्घकालीन ऊर्जा पायाभूत सुविधांशी संबंधित पीएम धारा कार्यक्रमालाही मंजुरी देण्यात आली आहे. नवीकरणीय ऊर्जेच्या वाढत्या वापरासाठी आवश्यक असलेले ग्रीड आणि स्मार्ट ग्रीड पायाभूत सुविधा विकसित करण्यावर या कार्यक्रमातून भर दिला जाणार आहे. मंत्रिमंडळाने मंजूर केलेल्या प्रस्तावांचे एकूण आर्थिक मूल्य २ लाख ७९ हजार १५७ कोटी रुपये असल्याचे सांगण्यात आले. यापैकी पीएम धारा कार्यक्रमासाठी १ लाख ८६ हजार ४०५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार आहे. देशातील वीज व्यवस्थेत नवीकरणीय ऊर्जेचा समावेश वाढविण्यासाठी ग्रीड आणि स्मार्ट ग्रीडच्या पायाभूत सुविधांना बळकटी देण्याचा या कार्यक्रमाचा उद्देश आहे.

मंत्रिमंडळाच्या बैठकीत दिल्लीसाठी इंटेलिजेंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टिम (खढचड) राबविण्यालाही मंजुरी देण्यात आली. या प्रकल्पासाठी अंदाजे १,७९० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून वाहतुकीवर देखरेख, वाहतूक कोंडीचे व्यवस्थापन आणि रस्ते सुरक्षेत सुधारणा करण्यावर या प्रणालीतून भर दिला जाणार आहे.

## पान १ वरून - कॅप्टन स्मित मच्छार यांचा...

पान १ वरून -

चाकूने हल्लाही केला. हा चाकू लागून स्मित मच्छर यांना दुखापतही झाली. मात्र, तरीही त्यांनी प्रतिकार करुन ओमानच्या वैमानिकाचा आत्मघाताचा प्रयत्न हाणून पाडला. स्मित मच्छर हे २०२२ मध्ये फ्लाय दुबईत वैमानिक म्हणून रुजू झाले होते. तत्पूर्वी १० वर्षे ते स्पाइस जेटमध्ये पायलट म्हणून काम करत होते. स्मित मच्छर त्यांच्या कुटुंबासह दुबईत वास्तव्यास आहे. फ्लाय दुबईचे विमान हवेत असताना नियंत्रण कक्षाला अचानक '७७००' हा स्कॉक कोड पाठवण्यात आला. काही वेळानंतर विमानाने '७५००' हा कोड प्रसारित केला, ज्याचा वापर सामान्यतः विमान हायजॅक झाल्यास किंवा कोणत्याही बेकायदेशीर हस्तक्षेपाच्या वेळी केला जातो. यानंतर विमानाने आपला मार्ग बदलून सौदी अरेबियाच्या दिशेने वळण घेतले. या विमानात इस्त्रायलयचे १५० प्रवाशी असल्यामुळे हे विमान हायजॅक झाल्याच्या शक्यतेने एकच खळबळ उडाली होती.

# डॉ. अशोकराव ढगे दाम्पत्याचा विवाहाचा सुवर्णमहोत्सव वृद्धाश्रमात



नेवासा तालुक्यातील प्रवरा संगम येथील कृषी शास्त्रज्ञ डॉ. अशोकराव ढगे आणि खेडले काजळीच्या माजी सरपंच सौ. निर्मला ढगे यांच्या विवाहाला ५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त त्यांनी आपल्या वैवाहिक जीवनाचा सुवर्णमहोत्सव अनोख्या पद्धतीने साजरा केला. हॉटेलमध्ये थाटामाटाचा सोहळा करण्याऐवजी शरणपूर वृद्धाश्रमातील ज्येष्ठांसोबत हा आनंदाचा क्षण साजरा करून त्यांनी सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण केला.

लग्नाच्या ५० व्या वाढदिवसानिमित्त कुटुंबात सोहळ्याची चर्चा सुरू झाली. पत्नी सौ. निर्मला ढगे यांनी याबाबत डॉ. ढगे यांना सांगितल्यानंतर त्यांनी आपल्या पन्नास वर्षांच्या सहजीवनाचा मागे वळून विचार केला. सुख-दुःखाचे अनेक प्रसंग, आयुष्यातील चढ-उतार आणि कुटुंबाने दिलेली साथ यांचे स्मरण करत त्यांनी हा सोहळा वेगळ्या पद्धतीने साजरा करण्याचा निर्णय घेतला. त्यांचा मुलगा प्रा. डॉ. समीर ढगे यांनी लग्नाचा ५० वा वाढदिवस एखाद्या चांगल्या हॉटेलमध्ये थाटामाटात साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला. मात्र, डॉ. ढगे यांनी आपल्या मनातील इच्छा मुलासमोर व्यक्त केली. नेवासा तालुक्यात खडका फाट्याजवळील शरणपूर वृद्धाश्रमात सुमारे २५ महिला आणि १५ पुरुष ज्येष्ठ नागरिक वास्तव्यास आहेत. त्यांच्यासोबत हा आनंदाचा दिवस साजरा करावा, त्यांना गोडधोड जेवण द्यावे आणि साधेपणाने हा सोहळा करावा, अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. वडिलांच्या या विचारामागील सामाजिक जाणीव आणि मूल्ये लक्षात घेऊन प्रा. डॉ. समीर ढगे यांनी क्षणाचाही विलंब न करता या प्रस्तावाला संमती दिली. त्यानंतर वृद्धाश्रमाचे व्यवस्थापक मगर यांची भेट घेऊन ढगे कुटुंबीयांनी आपला मनोदय सांगितला. कार्यक्रमाच्या खर्चाची काळजी करू नये, सर्व व्यवस्था करण्याची जबाबदारी कुटुंब आनंदाने स्वीकारेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

यानंतर वृद्धाश्रम परिसराची स्वच्छता करण्यात आली. ज्येष्ठ नागरिकांसाठी गोडधोड जेवणाची व्यवस्था करण्यात आली. कोणताही अनावश्यक थाटमाट किंवा दिखावा न करता साधेपणाने विवाहाच्या सुवर्णमहोत्सवाचा आनंद वृद्धाश्रमातील ज्येष्ठांसोबत वाटण्यात आला. डॉ. ढगे यांनी आपल्या नातेवाईकांनाही या कार्यक्रमाचे निमंत्रण देताना, घरी येण्याऐवजी थेट शरणपूर वृद्धाश्रमात येऊन या आनंदात सहभागी व्हावे, असे आवाहन केले. त्यांचे मित्र तथा पत्रकार सुधीरभाऊ चव्हाण यांनीही या उपक्रमात सहभागी होत ढगे दाम्पत्याच्या सामाजिक विचाराचे कौतुक केले.

पन्नास वर्षांच्या सहजीवनाचा आनंद स्वतःपुरता मर्यादित न ठेवता ज्येष्ठ नागरिकांसोबत वाटून घेण्याचा हा उपक्रम समाजासाठी एक सकारात्मक संदेश ठरला. आपल्या आई-वडिलांना दैवत मानावे, ज्येष्ठांचा सन्मान करावा आणि जीवनातील महत्त्वाचे प्रसंग सामाजिक बांधिलकी जपत साजरे करावेत, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. 'कालाय तस्मै नमः' या भावनेतून आयुष्याच्या पन्नास वर्षांच्या सहप्रवासाकडे पाहताना डॉ. अशोकराव ढगे आणि सौ. निर्मला ढगे यांनी निवडलेला हा साधेपणा आणि माणुसकीचा मार्ग त्यांच्या सुवर्णमहोत्सवाला अधिक अर्थपूर्ण करून गेला.

# आझाद मैदानावर पेन्शनर्सचा एल्गार

## मागण्या मान्य न झाल्यास संसद घेरावा




मुंबई (वृत्तसंस्था)

केंद्र सरकारने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांवरील जाचक व अन्यायकारक अटी रद्द करून पेन्शनर्सच्या प्रलंबित मागण्यांची तातडीने पूर्तता करावी, या मागणीसाठी नॅशनल कोऑर्डिनेशन कमिटी ऑफ पेन्शनर्स असोसिएशनच्या महाराष्ट्र राज्य शाखेतर्फे मुंबईतील ऐतिहासिक आझाद मैदानावर बुधवारी (दि. ३० सप्टेंबर) भव्य धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात रेल्वे, संरक्षण, आयकर, दूरसंचार, टपाल, नेव्ही, ऑर्डिनन्स फॅक्टरी यांसह विविध केंद्रीय सरकारी आस्थापनांतील हजारो सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

दूरसंचार विभागातील प्रमुख संघटना संचार निगम पेन्शनर्स वेलफेअर असोसिएशनचे महाराष्ट्र व गोवा राज्यातील तसेच केंद्रीय स्तरावरील पदाधिकारी या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी सभेला संबोधित करताना SNPWA चे राज्य सचिव तथा छउउझ- चे राज्य कार्यकारिणी सदस्य ज्ञानेश्वर गायकर पाटील यांनी केंद्र सरकारला आंदोलन तीव्र करण्याचा इशारा दिला. ते म्हणाले, पेन्शन हा कर्मचाऱ्यांचा हक्क आहे; सरकारची मेहरबानी नाही. आगामी हिवाळी अधिवेशनात २५ नोव्हेंबरपर्यंत महासंघाने मांडलेल्या आर्थिक विधेयक २०२५ मधील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांवरील जाचक व अन्यायकारक अटी रद्द न केल्यास देशभरातील पेन्शनर्स लोकसभा व राज्यसभेला घेराव घालतील.

सरकारने ईपीएफ पेन्शन, सामाजिक पेन्शन आणि सरकारी पेन्शनधारकांकडे बोजा म्हणून पाहण्याची मानसिकता बदलण्याची गरज असल्याचेही गायकर यांनी सांगितले. देशात सुमारे पाच कोटी पेन्शनधारक आहेत. त्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्यास साठीची काठी जमिनीवर न टेकवता ती राज्यकर्त्यांच्या डोक्यावर टेकवली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. आंदोलनादरम्यान विविध घटक संघटनांच्या प्रतिनिधींनी केंद्र सरकारच्या पेन्शनविषयक धोरणांवर टीका करत प्रलंबित मागण्यांकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली. सभेचे सूत्रसंचालन महाराष्ट्राचे मुख्य कार्यवाह एम. आय. जकाती यांनी केले तर अध्यक्षस्थानी एमटीएनएल संघटनेचे यादव होते.

# शेतकऱ्याला कायद्याचे संरक्षण, उत्पादन खर्चावर आधारित भाव पाहिजे- कृषितज्ज्ञ डॉ. बुधाजीराव मुळीक

## मित्रपरिवाराकडून ८६ व्या वर्षात पदार्पणानिमित्त सत्कार



पुणे (वृत्तसंस्था)

मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील अनेक भागांत पावसाच्या अनियमिततेमुळे शेती संकटात सापडली आहे. दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याची गरज आहे. तसेच शेतकऱ्याला कायद्याचे संरक्षण, शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव दिला पाहिजे, अशी मागणी ज्येष्ठ कृषितज्ज्ञ डॉ. बुधाजीराव मुळीक यांनी केली. डॉ. मुळीक यांनी २७ सप्टेंबर रोजी वयाची ८५ वर्षे पूर्ण करून ८६व्या वर्षात पदार्पण केले. त्यानिमित्त भूमाता परिवार आणि मित्रपरिवाराच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांनी राज्यातील दुष्काळ, हवामान बदल, शेतीचे प्रश्न आणि शेतकरी धोरणांबाबत भूमिका मांडली. प्रसिद्ध दिग्दर्शक व अभिनेते प्रवीण तरडे, ॲड. केदार सोमण, सामाजिक कार्यकर्ते राज देशमुख, माजी महापौर कमल व्यवहारे यांच्यासह कृषी, राजकीय व प्रशासनातील अनेक मान्यवरांनी डॉ. मुळीक यांना शुभेच्छा देत अभिष्टचिंतन केले.

डॉ. बुधाजीराव मुळीक म्हणाले, ''दुष्काळी भागातील प्रत्येक कुटुंबातील किमान दोन व्यक्तींना दररोज ३०० रुपये मजुरी देऊन त्यांच्या शेतातच जलसंधारण आणि शेतीची कामे उपलब्ध करून द्यावीत. त्यामुळे शेतकऱ्याच्या कुटुंबाला उत्पन्न मिळेल आणि त्याच्या शेतातील पाण्याच्या उपलब्धतेतही वाढ होईल. त्यातून शेतकऱ्याचा सन्मानही कायम राहील. शेती ही केवळ उपजीविकेचे साधन नसून, देशाचा प्राण आहे. शेतकऱ्याला त्याच्या उत्पादनासाठी कायद्याचे संरक्षण आणि उत्पादन खर्चावर आधारित योग्य भाव मिळाल्याशिवाय शेती व शेतकरी समृद्ध होणार नाही. शेतकरी समृद्ध झाला तरच देश समृद्ध होईल.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांची कर्जे माफ करून बँका, पतसंस्था आणि खासगी सावकारांची सक्तीची वसुली थांबवावी, अशी मागणी करत दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांच्या उच्च, तांत्रिक आणि वैद्यकीय शिक्षणाचा तसेच वसतिगृहाचा खर्च सरकारने करावा. पशुधनासाठी पाणी व चाऱ्याच्या छावण्या तातडीने सुरू कराव्यात, असेही त्यांनी सांगितले. युवा पिढीने कृत्रिम जीवन जगण्यापेक्षा निसर्गाशी नाळ जोडून नैसर्गिक जीवन जगावे. टेक्नॉलॉजी आणि शिक्षणाचा वापर शेतीतील कष्ट कमी करण्यासाठी, तण-खत व्यवस्थापनासाठी आणि गरजू लोकांच्या सेवेसाठी करा, असा संदेश त्यांनी दिला.

पूर्वी मराठवाडा हा धान्याचे कोठार मानला जात होता. मात्र, संकरित बियाणे, नगदी पिकांचा वाढता आग्रह आणि गायरानांचे कमी होणे यामुळे शेती व पशुधनासमोर संकट निर्माण झाले आहे. रासायनिक शेतीमुळे जमिनीची सुपीकता कमी होत असल्याने शहरातील जैविक कचऱ्यापासून सेंद्रिय खते तयार करून ती शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावीत. शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष उत्पादनाच्या नुकसानीवर आधारित कायदेशीर भरपाईची व्यवस्था महाराष्ट्रात निर्माण करण्याची गरज आहे. शुद्ध हवा, शुद्ध पाणी आणि शुद्ध अन्न हे मूलभूत हक्क आहेत आणि ते शेतकरीच उपलब्ध करून देतो, असे त्यांनी नमूद केले. प्रवीण तरडे व राज देशमुख यांनी डॉ. बुधाजीराव मुळीक गेल्या ६० वर्षांपासून शेती आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी वेगवेगळे प्रयोग करीत असून, त्यांचे योगदान मोलाचे असल्याचे सांगितले. डॉ. मुळीक यांनी आपले संपूर्ण आयुष्य शेतीमधील प्रयोगांसाठी वाहून घेतले आहे. वयाच्या पंच्याऐंशीमध्येही त्यांचे प्रयोग आणि शेतकऱ्यांसाठीचा लढा सुरु आहे. येत्या काळातही त्यांच्याकडून शेतकऱ्यांना व शेती क्षेत्राला मार्गदर्शन होत राहावे, असे मत व्यक्त केले. भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, डॉ. सुरेश पवार, डॉ. ा. ि. जाधव, महिपतराव फडतरे, ड. कमल सावंत, डॉ. श्यामराव भगत, सुरेश कोते, यशवंत खैरे, हेमंत सूर्यवंशी, सुरेश खोपडे आदी अनेक मान्यवरांनी डॉ. मुळीक यांचे अभिष्टचिंतन केले. अमेरिकेच्या कृषी खात्यात प्रधान अर्थशास्त्रज्ञ पदावर काम करणाऱ्या त्यांच्या कन्या डॉ. क्रांती मुळीक या वडिलांच्या वाढदिवसानिमित्त आवर्जून आल्या आहेत.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी युवक महोत्सव गरजेचा - मा. मंत्री थोरात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- युवकांमधील सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण विकासासाठी अशा युवक महोत्सवची गरज आहे. आजचा युवक हा केवळ नोकरी मागणारा न राहता त्याच्यामध्ये असणाऱ्या कलागुणांच्या माध्यमातून यशाच्या शिखरावर पोहोचू शकतो, त्यासाठी युवक महोत्सव हे एक चांगले माध्यम आहे. आजचा युवक हा देशाच्या परिवर्तनाचा केंद्रबिंदू असून, त्याने केवळ पुस्तकी ज्ञानावर अवलंबून न राहता त्याच्यामधे असणाऱ्या कलांच्या माध्यमातून आपला विकास करण्याचा प्रयत्न करावा आजच्या या महोत्सवाच्या माध्यमातून केवळ बक्षीसाचा विचार न करता विविध कला प्रकारांचा आनंद घ्यावा असे मत माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ आणि सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालय, संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित युवक महोत्सव 'जल्लोष २०२६' च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर डॉ. सविता कुलकर्णी, संचालक, विद्यार्थी विकास मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डॉ. संदीप पालवे, सदस्य, व्यवस्थापन परिषद, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, स.ब. वि.प्र.समाज संस्थेचे संचालक, प्रा. बाबा खरात, जिल्हा समन्वयक डॉ. प्रताप फलफले, प्राचार्य डॉ. बाळासाहेब वाघ, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. जयराम डेरे, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. लक्ष्मण घायवट, सांस्कृतिक समन्वयक प्रा. नानासाहेब गुंजाळ, महाविद्यालय प्रशासन अधिकारी, श्री. गोरक्षनाथ पानसरे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. पालवे म्हणाले की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ नेहमीच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देते. जल्लोष सारख्या महोत्सवातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आपली कला सिद्ध करण्याची संधी मिळत असते. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध २८ कलाप्रकार साध्य करण्यासाठी ही चांगली संधी असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी डॉ. कुलकर्णी म्हणाल्या की, आजचा सांस्कृतिक मंच केवळ स्पर्धेचा नाही तर स्वतःला सिद्ध करण्याचा आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून शिक्षणासोबतच कला, संस्कृती आणि आत्मविश्वास मिळतो, जो आयुष्याला उभारी देण्याचे काम करतो. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये जे जे कला गुण आहेत त्यांचा आविष्कार त्यांनी या मंचावर सादर असे आव्हान करण्यात आले. या कार्यक्रमाचे स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. बाळासाहेब वाघ यांनी केले तर प्रास्ताविक प्रा. जयराम डेरे यांनी केले.

# साकूर पठार भागातील एमआयडीसीसाठी आ. खताळ यांचा पाठपुरावा - रऊफ शेख

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर तालुक्यातील साकूर पठार भागातील कौठे मलकापूर येथे एमआयडीसी उभारण्याच्या प्रस्तावाला गती देण्यासाठी आमदार अमोल खताळ पाटील यांचा शासनस्तरावर सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरू आहे. विधानसभा निवडणुकीत दिलेले रोजगाराचे आश्वासन पूर्ण करण्याच्या दिशेने त्यांनी ठोस पावले उचलली असल्याचा दावा भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाचे अहिल्यानगर उत्तर जिल्हाध्यक्ष रऊफ शेख यांनी केला. आ. खताळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार तसेच उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडे कौठे मलकापूर एमआयडीसीसाठी पाठपुरावा केला आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व युवा नेते सुजयदादा विखे पाटील यांच्या सहकार्याने हा विषय शासनदरबारी पुढे नेला जात असल्याचे शेख यांनी सांगितले.

एमआयडीसीचा विषय केवळ प्रसिद्धीपुरता मर्यादित नसून शासनस्तरावर आवश्यक प्रक्रिया सुरू आहे. विधिमंडळाच्या अधिवेशनातही आ. खताळ यांनी हा प्रश्न मांडला असून, कौठे मलकापूर येथील प्रस्तावाची तांत्रिक पूर्तता झाल्यानंतर पुढील कार्यवाही अपेक्षित आहे, असा दावा शेख यांनी केला. गेल्या ४० वर्षांत संगमनेर तालुक्यात एमआयडीसी आणण्याचा विचार झाला नाही. आता प्रस्ताव शासनदरबारी गेल्यानंतर त्याचे श्रेय घेण्यासाठी धडपड का? असा सवाल करत त्यांनी पदवीधर आमदारांवर टीका केली.

साकूर पठाराच्या पाणीप्रश्नाबाबतही शासनस्तरावर पाठपुरावा सुरू असून, पाणी आणि औद्योगिक विकास हे दोन्ही प्रश्न मार्गी लावण्याचा आ. खताळ यांचा प्रयत्न असल्याचे शेख यांनी सांगितले.

पदवीधर मतदारसंघाची व्याप्ती पाच जिल्हे व ५३ तालुक्यांची असल्याने संबंधित आमदारांनी संपूर्ण मतदारसंघातील पदवीधरांच्या प्रश्नांकडे लक्ष द्यावे, असा टोला शेख यांनी नाव न घेता लगावला. कौठे मलकापूरचा प्रस्ताव शासनाकडे असताना इतर पर्यायी ठिकाणांची चर्चा होत असल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

साकूर पठारातील युवकांना रोजगार, शेतकऱ्यांना पाणी आणि परिसराला औद्योगिक विकास मिळणे महत्त्वाचे आहे. एमआयडीसीचे श्रेय कोणाला मिळते यापेक्षा ती प्रत्यक्षात उभी राहून स्थानिक युवकांना रोजगार मिळणे, हेच आमचे ध्येय आहे, असे रऊफ शेख यांनी स्पष्ट केले.

पान १ वरून -

## आश्रमशाळांच्या...

मंत्री शिरसाट यांच्या स्वीय सहाय्यक भंडारे यांच्यावर आरोप करताना निटूरे यांनी, एका वसतिगृहातील २४ विद्यार्थ्यांच्या मान्यतेसाठी ३५ ते ४० लाख रुपयांची मागणी झाल्याचा दावा केला. या प्रकरणाशी संबंधित पुरावे देण्यास आपण तयार असल्याचेही त्यांनी सांगितले.

समाजकल्याण विभागातील अधिकारी व प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही निटूरे यांनी प्रश्न उपस्थित केले. पैसे दिल्याशिवाय फायली पुढे सरकत नसल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच दलित वस्तीच्या कामांमध्ये कमिशनखोरी होत असल्याचा दावाही त्यांनी केला.

मंत्री संजय शिरसाट यांच्या कथित संपत्तीबाबतही निटूरे यांनी प्रश्न उपस्थित करत तिची चौकशी करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, एका आश्रमशाळा संस्थाचालकाने थेट सामाजिक न्याय मंत्र्यांच्या यंत्रणेवर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप केल्याचा व्हिडिओ प्रसारित केल्याने राजकीय व प्रशासकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

# गुंजाळवाडीत भटके-विमुक्तांसाठी दाखले शिबिराचे आयोजन



संगमनेर : भटके-विमुक्त समाजातील नागरिकांना त्यांच्या हक्काचे शासकीय दाखले मिळवून देतानाच विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळावा, या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या 'राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता' अभियानांतर्गत भटके-विमुक्त हक्क व प्रमाणपत्र अभियानाच्या विशेष मोहिमेत गुंजाळवाडी माळ येथील अठरापगड वसाहतीत मंगळवारी विशेष 'भटके-विमुक्त दाखले शिबिरा'चे आयोजन करण्यात आले.

इतर मागास बहुजन कल्याण विभाग, अहिल्यानगरचे सहाय्यक संचालक कार्यालय, तहसील कार्यालय संगमनेर (महसूल विभाग) आणि लोकविधान संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर घेण्यात आले. शिबिराचे उद्घाटन सहाय्यक संचालक विनोद लोंढे यांच्या हस्ते झाले. यावेळी तहसीलदार धीरज मांजरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

भटके-विमुक्त समाजातील अनेक नागरिकांना आवश्यक कागदपत्रे व प्रमाणपत्रांच्या अभावामुळे शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यात अडचणी येतात. ही अडचण दूर करण्यासाठी शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना जात व इतर आवश्यक प्रमाणपत्रांसाठी लागणारी कागदपत्रे, अर्ज प्रक्रिया तसेच शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती देण्यात आली. नागरिकांना प्रमाणपत्र मिळविण्याच्या प्रक्रियेबाबत मार्गदर्शनही करण्यात आले. प्रशासन आणि सामाजिक संस्थांच्या संयुक्त प्रयत्नातून राबविण्यात येत असलेल्या या मोहिमेमुळे भटके-विमुक्त समाजातील नागरिकांना शासकीय योजनांच्या प्रवाहात आणण्यास मदत होणार आहे.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी नायब तहसीलदार अनुप गिरी, तलाठी प्रवीण ढोले, सुनील अभियेकर तसेच लोकविधान संस्थेचे संदीप आखाडे, रवी दिवे, विशाल इंद्रेकर, राजू वाघ, विमल सावंत, जया वाघ, दीपक पाळंदे, शिवाजी आव्हाड आदींनी सहकार्य केले.

# बिगर शेती मतदारसंघातून परिघा आरोटे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या बिगर शेती मतदारसंघातून सौ. परिघा विश्वास आरोटे यांनी गुरुवारी उमेदवारी अर्ज दाखल केला. जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांच्याकडे त्यांनी नामनिर्देशनपत्र सादर केले.

यावेळी कु. सोनेरी विश्वास आरोटे, संजय फुलसुंदर, विनोद गायकवाड यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. आरोटे या अकोले तालुक्यातील सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात सक्रिय असून, त्यांच्या उमेदवारीमुळे बिगर शेती मतदारसंघातील निवडणुकीत चुरस वाढली आहे.

बिगर शेती मतदार संघातून अकोलेमधून अरोटे यांचा पहिला अर्ज दाखल झाला असून त्यांच्या उमेदवारीमुळे या मतदार संघात मोठी चुरस वाढणार आहे.



# भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे संगमनेरमध्ये रक्तदान शिबिर



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपच्या वतीने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबरदरम्यान 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत भाजपा अल्पसंख्यांक मोर्चा, अहिल्यानगर उत्तर जिल्ह्याच्या वतीने संगमनेर येथील व्यापारी असोसिएशन हॉलमध्ये भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाच्या नवनियुक्त जिल्हा कार्यकारिणीतील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होत उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे, या सामाजिक उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रीस मुलतानी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, प्रदेश उपाध्यक्ष सलीम बागवान, प्रदेश महामंत्री एजाज शेख यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाध्यक्ष रऊफ शेख यांच्या नेतृत्वाखाली शिबिराचे आयोजन करण्यात आले.

यावेळी भाजपा जिल्हा महामंत्री तथा अल्पसंख्यांक मोर्चा जिल्हा प्रभारी सिताराम भांगरे, भाजयुमो जिल्हाध्यक्ष रोहित चौधरी, भाजपा शहराध्यक्षा पायलताई ताजणे, सरचिटणीस साहेबराव वलवे, शुभम लहामगे आदी उपस्थित होते. संगमनेर, अकोले, राहाता, कोपरगाव, श्रीरामपूर, नेवासा व राहुरी परिसरातील अल्पसंख्यांक मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्ते शिबिरात सहभागी झाले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा कार्यकारिणीतील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# अमृतवाहिनी एमबीए कॅम्पसमध्ये रोजगार महाकुंभ मेळावा उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी कार्यरत असलेल्या अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेच्या अमृतवाहिनी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन (एमबीए), संगमनेर येथे महाराष्ट्र शासनाच्या 'रोजगार महाकुंभ-महाराष्ट्र' या राज्यव्यापी उपक्रमांतर्गत विशेष रोजगार महाकुंभ मेळावा उत्साहात संपन्न झाला. मंगळवार, २९ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्यात विविध महाविद्यालयांतील ५०० पेक्षा अधिक युवकांनी सहभाग नोंदविला. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील २७ कंपन्यांनी सहभाग घेऊन युवकांना रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध करून दिल्या.

युवकांना त्यांच्या शैक्षणिक पात्रता, कौशल्ये आणि क्षमतेनुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देतानाच उद्योगांना आवश्यक असलेले कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. उद्योग आणि शिक्षण क्षेत्र यांच्यातील समन्वय अधिक दृढ करून युवकांना रोजगाराच्या संधींची माहिती एकाच व्यासपीठावर उपलब्ध करून देण्यासाठी हा मेळावा आयोजित करण्यात आला. या रोजगार महाकुंभामध्ये विविध क्षेत्रांतील रोजगाराच्या संधींचा समावेश करण्यात आला. आयटीआय व कौशल्याधारित व्यवसाय, अभियांत्रिकी व तांत्रिक पदे, एमबीए क्षेत्रातील मार्केटिंग, फायनान्स, एचआर, ऑपरेशन्स व बिझनेस नालिटिक्स, फार्मसी व हेल्थकेअर, सेल्स व बिझनेस डेव्हलपमेंट, प्रशासन व सपोर्ट फंक्शन्स, इंटर्नशिप, अप्रेंटिसशिप, मॅनेजमेंट ट्रेनी तसेच प्रवेशस्तरावरील आणि अनुभवी उमेदवारांसाठीच्या पदांचा समावेश होता.

उद्योगांकडून उपलब्ध झालेल्या रोजगाराच्या संधी योग्य उमेदवारांपर्यंत पोहोचवून "Industry Requirement - Right Talent - Right Skill - Right Opportunity - Employment - Career' या संकल्पनेनुसार रोजगाराची साखळी निर्माण करण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला. उद्योगांकडून उपलब्ध होणारी प्रत्येक रोजगाराची संधी युवकाच्या करिअरला योग्य दिशा देऊ शकते, या उद्देशाने उद्योगांना या उपक्रमात सहभागी करून घेण्यात आले. अमृतवाहिनी एमबीए महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक कौशल्यांचा विकास, उद्योगाभिमुख प्रशिक्षण, संवादकौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास, मुलाखत तंत्र तसेच करिअर मार्गदर्शन यावर सातत्याने भर दिला जातो. बदलत्या औद्योगिक क्षेत्राच्या गरजा लक्षात घेऊन विद्यार्थ्यांमध्ये रोजगारासाठी आवश्यक कौशल्ये विकसित व्हावीत, यासाठी संस्थेच्या वतीने विविध उपक्रम राबविले जातात. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून आयोजित करण्यात आलेल्या रोजगार महाकुंभामध्ये उद्योग, एमएसएमई, कॉर्पोरेट कंपन्या, भरती संस्था, प्लेसमेंट एजन्सी, स्टार्टअप्स आणि उद्योजक सहभागी झाले. युवकांना त्यांच्या शैक्षणिक पात्रता व कौशल्यानुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि उद्योगांना आवश्यक असलेले कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देणे, हे या उपक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट राहिले.

# डॉ. संतोष मैड यांना 'एम.एस. सिग्नेचर इंटरनॅशनल अवॉर्ड'




युवावार्ता (प्रतिनिधी)

राहाता - येथील डॉ. मैड मल्टिस्पेशालिटी रुग्णालयाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. संतोष मैड यांना अमेरिकेतील (बोस्टन) प्रसूतितज्ज्ञ मेलोडी एकार्ड्स यांच्या हस्ते एम. एस. सिग्नेचर इंटरनॅशनल अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले. सिमला येथील मानला हाऊस येथे आयोजित सोहळ्यास या संस्थेचे अध्यक्ष हिमांशू वर्मा व दिल्लीचे सार्वजनिक आरोग्य प्रशासन विभाग प्रमुख डॉ. हिमांशू भूषण उपस्थित होते.

डॉ. मैड यांनी ग्रामीण भागात आरोग्य क्षेत्रात दिलेले विशेष योगदान, प्रसूती व स्त्रीरोगशास्त्र आणि महिलांचे आरोग्य याबाबत विशेष सहभाग, समाजातील वंचित घटकांना परवडणाऱ्या दरात आरोग्य सेवा देण्यासाठी, तसेच सरकारी आरोग्य योजनांचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी ते करीत असलेले प्रयत्न, त्यामुळे या कुटुंबांवरचा कमी होणारा आर्थिक भार, ग्रामीण भागात नियमितपणे आरोग्य शिबिरांचे आयोजन, उच्च जोखमीच्या गर्भधारणा आणि रुग्णालयातील प्रसूती याबद्दल जनजागृती या सर्व बाबी लक्षात घेऊन त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष शालिनी विखे पाटील, युवा नेते डॉ. सुजय विखे पाटील व नगराध्यक्ष डॉ. स्वाधीन गाडेकर यांनी डॉ. मैड यांचे अभिनंदन केले.

# संपादकीय...

जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनविशेष

## ज्येष्ठांकडे पाहण्याची दृष्टी बदलण्याची गरज

ज्येष्ठ नागरिक दिन हा केवळ ज्येष्ठांच्या सन्मानाचा दिवस नाही, तर समाजाने स्वतःच्या वागणुकीकडे पाहण्याचा दिवस आहे. आयुष्याची अनेक दशके कुटुंब, समाज आणि देशासाठी देणाऱ्या या पिढीने आजच्या समाजाची पायाभरणी केली आहे. त्यांच्या अनुभवातून कुटुंबाला दिशा मिळते, त्यांच्या आठवणींमधून इतिहास जिवंत राहतो आणि त्यांच्या संस्कारातून पुढची पिढी घडते. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांकडे केवळ 'वयस्कर व्यक्ती' म्हणून पाहण्याऐवजी अनुभवाची संपत्ती आणि समाजाची अमूल्य ताकद म्हणून पाहण्याची गरज आहे. आज जगभरात १ ऑक्टोबर हा जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन म्हणून साजरा केला जातो. वाढते आयुर्मान, बदलती कुटुंबव्यवस्था आणि झपाट्याने बदलणारी जीवनशैली यामुळे ज्येष्ठ नागरिकांच्या प्रश्नांचे स्वरूपही बदलत आहे. पूर्वी संयुक्त कुटुंबात ज्येष्ठ व्यक्ती कुटुंबाच्या केंद्रस्थानी असायच्या. निर्णयप्रक्रियेत त्यांचा सहभाग असायचा. नातवंडांसाठी आजी-आजोबा म्हणजे संस्कारांचे विद्यापीठ असायचे. मात्र शहरीकरण, रोजगारासाठी होणारे स्थलांतर, विभक्त कुटुंबपद्धती आणि बदलती जीवनशैली यामुळे अनेक ज्येष्ठ व्यक्ती आज एकटेपणाचा सामना करताना दिसतात.

ज्येष्ठत्व ही समस्या नाही; मात्र ज्येष्ठत्वाकडे पाहण्याची समाजाची दृष्टी ही समस्या ठरू शकते. आज तंत्रज्ञानाच्या युगात जग अक्षरशः हातातील मोबाईलमध्ये आले आहे. बँकिंगपासून आरोग्यसेवा, सरकारी योजना, तिकीट बुकिंगपासून संवादापर्यंत सर्व काही डिजिटल झाले आहे. ही प्रगती स्वागतार्ह असली तरी डिजिटल जगाशी जुळवून घेणे अनेक ज्येष्ठांसाठी आव्हानात्मक आहे. ऑनलाइन व्यवहार, डिजिटल कागदपत्रे, ओटीपी, विविध ॲप्स आणि सायबर सुरक्षेच्या बाबतीत त्यांना अनेकदा अडचणी येतात. त्यामुळे 'तुम्हाला हे जमत नाही' असे म्हणण्यापेक्षा 'चला, आपण शिकूया' अशी भूमिका तरुण पिढीने घेतली पाहिजे.

ज्येष्ठ नागरिकांच्या आयुष्यातील आणखी एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे एकटेपणा. आर्थिकदृष्ट्या सक्षम असले तरी भावनिक आधाराची कमतरता अनेकांच्या आयुष्यात जाणवते. घरातील प्रत्येक व्यक्ती आपापल्या कामात व्यस्त असताना ज्येष्ठ व्यक्तींना संवादासाठी वेळ मिळत नाही. त्यांना मोठ्या अपेक्षा नसतात; अनेकदा त्यांना फक्त कोणीतरी जवळ बसून दोन शब्द बोलावे, त्यांच्या अनुभवांविषयी विचारावे, एवढीच इच्छा असते. म्हणूनच ज्येष्ठांसाठी सर्वात मोठी गरज कधी कधी औषधांची नसते, तर आपुलकीची असते. आरोग्य हा ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. वाढते वय, विविध आजार, औषधोपचार आणि नियमित तपासण्यांचा खर्च यामुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक भार पडतो. ग्रामीण भागातील ज्येष्ठांना तर चांगल्या आरोग्यसेवा मिळवण्यासाठी दूरवर जावे लागते. त्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रांपासून मोठ्या रुग्णालयांपर्यंत ज्येष्ठांसाठी सुलभ, परवडणाऱ्या आणि सन्मानपूर्वक आरोग्यसेवेची व्यवस्था मजबूत होणे आवश्यक आहे. त्याचबरोबर ज्येष्ठ नागरिकांच्या आर्थिक सुरक्षिततेचा प्रश्नही गंभीर आहे. निवृत्तीवेतन, बचत किंवा मुलांवर असलेले आर्थिक अवलंबित्व यामुळे अनेक ज्येष्ठ असुरक्षित होतात. फसवणुकीचे प्रकार, सायबर गुन्हे आणि मालमत्तेच्या वादांमध्ये ज्येष्ठ नागरिक लक्ष्य बनतात. अशा परिस्थितीत कायदे, प्रशासकीय यंत्रणा आणि समाज या तिन्ही घटकांनी त्यांच्या सुरक्षेसाठी संवेदनशीलपणे काम करण्याची गरज आहे. मात्र ज्येष्ठ नागरिकांकडे केवळ मदतीची गरज असलेला वर्ग म्हणून पाहणेही योग्य नाही. त्यांच्याकडे अनुभव, कौशल्य, ज्ञान आणि वेळ आहे. निवृत्त शिक्षक शैक्षणिक मार्गदर्शन करू शकतात, निवृत्त अधिकारी प्रशासनाचा अनुभव देऊ शकतात, उद्योजक तरुणांना व्यवसायाची दिशा देऊ शकतात, तर शेतकरी पिढ्यान्पिढ्यांचे कृषिज्ञान पुढे नेऊ शकतात. समाजाने या अनुभवाचा उपयोग करून घेतला तर ज्येष्ठ नागरिक हे विकास प्रक्रियेतील सक्रिय भागीदार बनू शकतात. कुटुंबाची भूमिका येथे सर्वांत महत्त्वाची आहे. ज्येष्ठांची काळजी घेणे म्हणजे केवळ त्यांच्या औषधांची व्यवस्था करणे नव्हे. त्यांच्या मतांचा आदर करणे, निर्णयांमध्ये त्यांचा सहभाग ठेवणे, त्यांच्यासोबत वेळ घालवणे आणि त्यांना कुटुंबाचा अविभाज्य भाग असल्याची जाणीव करून देणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. ज्येष्ठ नागरिक दिनाच्या निमित्ताने आपण एक संकल्प करूया-ज्येष्ठांचा सन्मान केवळ एका दिवसापुरता मर्यादित ठेवणार नाही. त्यांच्या अनुभवाला किंमत देऊ, त्यांच्या अडचणी समजून घेऊ आणि त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धाला अधिक सुरक्षित, आनंदी आणि सन्मानपूर्ण बनवण्यासाठी प्रयत्न करू.

## पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला अकोलेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

### १५१७ गणेशमूर्तींचे संकलन; २.५ टन निर्माल्याचे दान



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अकोले नगरपंचायतीच्या वतीने यंदाचा गणेशोत्सव व गौरी उत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्यात आला. पर्यावरणाचे संरक्षण, जलस्त्रोतांचे प्रदूषण रोखणे आणि स्वच्छतेबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने नगरपंचायतीने विविध उपक्रम राबविले. या उपक्रमांना अकोलेकर नागरिक, गणेश मंडळे, शैक्षणिक संस्था आणि स्वयंसेवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

नगरपंचायतीच्या 'पर्यावरणपूरक गणेशोत्सव' उपक्रमांतर्गत नागरिकांना शाडू मातीच्या मूर्तींचा वापर, कागदी मखर व नैसर्गिक सजावटीला प्राधान्य देण्याचे आवाहन करण्यात आले होते. तसेच प्लास्टिक व थर्माकोलचा वापर टाळणे, फटाकेमुक्त उत्सव साजरा करणे आणि ध्वनीप्रदूषणाला आळा घालण्याचे आवाहनही करण्यात आले. यंदा अकोले शहरात १,५१७ गणेशमूर्तींचे संकलन करण्यात आले. तसेच नागरिकांकडून सुमारे २.५ टन निर्माल्याचे संकलन व दान करण्यात आले. कृत्रिम विसर्जन व्यवस्था आणि निर्माल्य संकलनामुळे नदी व जलस्त्रोतांचे प्रदूषण रोखण्यास मदत झाली. नागरिकांनी पर्यावरणपूरक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करून नगरपंचायतीच्या उपक्रमाला दिलेला प्रतिसाद विशेष उल्लेखनीय ठरला.

गणेश विसर्जनाच्या दिवशी पर्यावरणपूरक पद्धतीने उत्सव साजरा करणाऱ्या गणेश मंडळांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी नगरपंचायतीच्या अध्यक्षा सौ. सोनालीताई नाईकवाडी, उपनगराध्यक्ष श्री. शरद नवले, माजी अध्यक्ष श्री. बाळासाहेब वडजे, मुख्याधिकारी श्रीमती धनश्री पवार यांच्यासह नगरसेवक व नगरसेविका उपस्थित होते. या उपक्रमात अगस्ती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय तसेच मॉर्डन कॉलेज यांच्या छडड विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी निर्माल्य संकलन, स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती केली. नगरपंचायतीच्या या उपक्रमामुळे गणेशोत्सवाच्या माध्यमातून 'स्वच्छ अकोले, सुंदर अकोले आणि पर्यावरणपूरक अकोले' असा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचला. नागरिकांनी दाखविलेल्या सहकार्यामुळे यंदाचा गणेशोत्सव धार्मिक उत्सवासोबतच पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकीचा आदर्श ठरला, असे नगरपंचायतीच्या वतीने सांगण्यात आले.

## सामाजिक योगदानासाठी कावेरी घोलप यांचा गौरव



युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष सन्माननीय श्रीपाल सबनीस साहेब यांच्या हस्ते, मान्यवरांच्या उपस्थितीत अहिल्यानगर येथील श्रीमती कावेरी दिनेश घोलप यांना 'राजमाता जिजाऊ समाजभूषण पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले.

हा पुरस्कार संगीत, शिक्षण, कला, साहित्य, सामाजिक कार्य, आरोग्य, उद्योग, पर्यावरण आणि सांस्कृतिक क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक बांधिलकी जपत कावेरी घोलप यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या या बहुआयामी सामाजिक योगदानाची दखल घेत त्यांना हा सन्मान देण्यात आला. रानकवी प्रतिष्ठान व ज्ञानाई फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १०० वे राज्यस्तरीय पुणे मराठी काव्य संमेलन महात्मा फुले सांस्कृतिक भवन, प्रतिमा नगर, पुणे येथे नुकतेच संपन्न झाले. याच कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कावेरी घोलप यांच्या सामाजिक व विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून कौतुक व अभिनंदन होत आहे.

## नवरात्रीत होणार जागर आरोग्याचा

### 'मुख्यमंत्री आरोग्य संवाद' उपक्रमातून वैद्यकीय तज्ज्ञ साधणार तरुणाईशी संवाद



मुंबई- नवरात्रोत्सवात राज्यातील महाविद्यालयीन तरुणाईच्या आरोग्याचा जागर केला जाणार आहे. वाढता स्क्रीन टाइम, अपुरी झोप, चुकीच्या आहाराच्या सवयी, व्यायामाचा अभाव आणि मानसिक ताण यामुळे तरुणांचे आरोग्याकडे दुर्लक्ष होत आहे. या पार्श्वभूमीवर आजार टाळण्यासाठी तरुण वयापासूनच आरोग्यदायी जीवनशैलीबाबत जागृती व्हावी, यासाठी राज्यात प्रथमच 'मुख्यमंत्री आरोग्य संवाद' हा नऊ दिवसांचा विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमातून राज्यातील विद्यापीठे आणि वैद्यकीय महाविद्यालयांतील प्राध्यापक व वैद्यकीय तज्ज्ञ राज्यभरातील विद्यार्थ्यांशी थेट आरोग्यविषयक संवाद साधणार आहेत.

राज्यातील वैद्यकीय, कृषी, अभियांत्रिकी, विज्ञान, वाणिज्य, कला आणि इतर विद्याशाखांतील विद्यार्थी या उपक्रमात सहभागी होतील. प्रत्येक जिल्ह्यातील वैद्यकीय महाविद्यालयांतील प्राध्यापक, विभागप्रमुख आणि वैद्यकीय तज्ज्ञ विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. तरुण वयात आरोग्याकडे दुर्लक्ष झाल्यास त्याचे परिणाम पुढील आयुष्यात जाणवू शकतात. त्यामुळे आजार झाल्यानंतर उपचार घेण्याबरोबरच आजार टाळण्यासाठी योग्य आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप, मानसिक आरोग्याची काळजी, व्यसनांपासून दूर राहणे आणि वेळेवर आरोग्य तपासणी यांचे महत्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले जाणार आहे. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या आरोग्याबाबत जागृत राहण्याबरोबरच ही माहिती कुटुंब, मित्र आणि समाजापर्यंत पोहोचवावी, हा या उपक्रमामागील उद्देश आहे.

संवादाचे विषय - बदलती जीवनशैली आणि तरुणांचे आरोग्य, संतुलित आहार आणि बदललेल्या आहाराच्या सवयी, व्यायाम आणि शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक आरोग्य, मोबाईल, सोशल मीडिया आणि वाढता स्क्रीन टाइम, व्यसनांपासून दूर राहणे. निरोगी जीवनशैली आणि आरोग्यदायी समाजनिर्मित.


CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
SHAHENAJ ISMAIL KHAN
TO NEW NAME
SHAHENAJBI FAKIR MOHAMMAD SHAIKH
UIDAI 835171618844
ADRESS - AT POST KURAN TAL SANGAMNER 422605

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
1) FAKIRMOHAMMAD IMAM SHAIKH
2) SHE FAKIR MOHAMMAD JANU
TO NEW NAME
FAKIR MOHAMMAD IMAM SHAIKH
UIDAI 504322503456
ADRESS - AT POST KURAN TAL - SANGAMNER 422605

पाहिजेत
कॉम्प्युटर ऑपरेटर - ४
अकाऊंटंट - २
सेल्समन - ५
(इन्सेंटीव्ह दिला जाईल)
आकर्षक पगार दिले जाईल
9822097904
9404971697
भेटण्याची वेळ (सायं ४ ते ७)

जागा भरणे आहे
ऑफिस बॉय
ऑफिस क्लार्क
महिला किंवा पुरूष
इलेक्ट्रॉनिक मशिनरी चालविणेचा अनुभव असलेला कारागीर
वॉचमेन
अनुभवास प्राधान्य
- संपर्क -
9822334431


## श्री ओंकारनाथ मालपाणी विधी महाविद्यालयाचा आंतर महाविद्यालयीन हॉकी स्पर्धेत विजय



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- श्री ओंकारनाथ मालपाणी विधी महाविद्यालयाच्या पुरुष हॉकी संघाने आंतरमहाविद्यालयीन हॉकी स्पर्धेत दमदार कामगिरी करत ऐतिहासिक विजेतेपद पटकावले. महाविद्यालयाच्या क्रीडा इतिहासात प्रथमच आंतरमहाविद्यालयीन हॉकी स्पर्धेचे विजेतेपद मिळवण्याचा मान संघाने मिळवला आहे. प्रवरा पब्लिक स्कूल, लोणी येथे या स्पर्धेचे आयोजन प्रवरा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग यांच्या वतीने करण्यात आले होते. उपांत्य फेरीच्या सामन्यात विधी महाविद्यालयाच्या संघाने संगमनेर कॉलेजचा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम सामन्यात संजीवनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगवर मात करत संघाने विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. नियमित सराव, शिस्त, सांघिक समन्वय आणि जिद्दीच्या जोरावर खेळाडूंनी ही उल्लेखनीय कामगिरी केली.

विजयी संघात ओंकार देशमुख, निलेश टाके, आविष्कार वाबळे, अनिकेत आवाळे, प्रणव वाडेकर, अभिषेक सोनवणे, श्रवण शिंदे, पुष्कल लोहार, युवराज गुरव, अनिकेत घुगे, प्रणव गोरे, प्रसाद सोनवणे, दर्शन तुपे आणि सुयश गडाख यांचा समावेश होता. संघाच्या सांघिक खेळामुळे आणि निर्णायक क्षणी केलेल्या प्रभावी कामगिरीमुळे विजेतेपदाला गवसणी घालणे शक्य झाले. दरम्यान, या स्पर्धेतील उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आंतरविभागीय हॉकी स्पर्धेसाठी संघातील सात खेळाडूंची निवड झाली आहे. त्यामुळे या ऐतिहासिक विजेतेपदासोबतच विद्यापीठ पातळीवर खेळण्याची संधी खेळाडूंना मिळाली आहे. स्पर्धेतील यशाबद्दल शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. संजय मालपाणी, सचिव डॉ. राजेंद्र लढ्ढा, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय मनिआर, उपप्राचार्य डॉ. राहुल देशमुख, क्रीडा विभाग प्रमुख श्री. प्रशांत शेनकर, कार्यालयीन अधीक्षक श्री सचिन वालझाडे, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी विजेत्या संघाचे अभिनंदन करुन पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.








पाहिजेत
नॅशनल मेडीकल हॉस्पिटल ऑफ आयुर्वेदिक सायन्स
वेल्हाळे, ता. संगमनेर
पंचकर्म थेरापिस्ट
पुरूष-१/ स्त्री -१
आकर्षक पगार
9370071777
8806292948

पाहिजेत
दुकान कामासाठी होतकरू मुलगा पाहिजे - २ जागा
आकर्षक पगार
राजा ड्रेसेस
बाजारपेठ, ता. संगमनेर, जि. अ.नगर
8275191096

स्टोन क्रशर उद्योगासाठी पाहिजेत
अकाऊंटंट मॅनेजर
अकाऊंटस व फायनान्स क्षेत्रातील अनुभव असलेले उमेदवारास प्राधान्य
Tally, GST, Accounting, MIS Report चे ज्ञान आवश्यक
टिम हाताळण्याची क्षमता असावी
पगार - २०,००० ते २५,००० प्रति महिना (अनुभवानुसार आकर्षक वेतन)
इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा
पत्ता : स्टोनेक्स सेल्स अँड रिफॅार्म्स, धुळवड, ता. सिन्नर
- संपर्क -
सांगळे साहेब - 9850194463 9503947084

# सावरगाव पाटच्या सुपुत्राला 'ठाणे गौरव' पुरस्कार जाहीर



## पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते सागर परशुराम नेहे सन्मानीत

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अकोले तालुक्यातील सावरगाव पाटचे सुपुत्र, ज्येष्ठ पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते तथा लोढा ग्रुपचे मीडिया हेड सागर परशुराम नेहे यांची विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत ठाणे महानगरपालिकेच्या 'ठाणे गौरव' पुरस्कारासाठी बहुमताने निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीबद्दल सावरगाव पाटसह अकोले तालुक्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

ठाणे महानगरपालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त दरवर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचा ठाणे गुणीजन, ठाणे गौरव, ठाणे भूषण, विशेष क्रीडा व विशेष कला पुरस्कारांनी सन्मान करण्यात येतो. यंदाच्या 'ठाणे गौरव' पुरस्कारासाठी सागर नेहे यांची निवड करण्यात आली आहे.

गुरुवार, दि. १ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता ठाणे येथील राम गणेश गडकरी रंगायतन येथे आयोजित विशेष समारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. ठाणे महापालिकेच्या महापौर सौ. शर्मिला रोहित पिंपळोलकर यांनी सागर नेहे यांना पुरस्कार निवडीबाबतचे पत्र देत त्यांचे अभिनंदन केले आहे.

सागर नेहे हे अकोले तालुक्यातील सावरगाव पाट येथील रहिवासी असून, ज्येष्ठ कवी परशुराम नेहे यांचे पुत्र आहेत. ठाणे शहरातील श्री दत्त ज्येष्ठ नागरिक संघाचे कार्याध्यक्ष म्हणूनही ते सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत. पत्रकारिता, सामाजिक कार्य आणि माध्यम क्षेत्रात त्यांनी केलेल्या योगदानाची दखल घेत त्यांना हा सन्मान जाहीर झाला आहे.

ग्रामीण भागातून पुढे येत ठाण्यासारख्या महानगरात विविध क्षेत्रांत आपल्या कार्याची स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या सागर नेहे यांच्या या पुरस्कारामुळे सावरगाव पाट आणि अकोले तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. त्यांच्या निवडीबद्दल विविध सामाजिक, पत्रकारिता व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

## पान १ वरून - हिवरगावात पावसाचा तडाखा...

कष्टातून पीक उभे करतो मात्र पावसा अभावी पिके वाया गेली आहेत. काही भागांमध्ये शेतकऱ्यांनी आत्महत्या केले आहेत हे अत्यंत दुर्दैवी आहे शेतकऱ्यांनी ही अशा संकट काळामध्ये ठाम उभे राहावे याचबरोबर राज्यातील सर्व शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करण्याबरोबर सरकारने शेतकऱ्यांना मोठी आर्थिक मदत करावी अशी मागणी मा महसूल बाळासाहेब थोरात यांनी यावेळेस केली आहे. मा. कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांनी दिलेल्या भेटीनंतर सदर नागरिक व शेतकऱ्यांना दिलासा मिळाला.

# १ ऑक्टोबरपासून सर्वसामान्यांच्या खिशाला झळ

## गॅसपासून इलेक्ट्रॉनिक्सपर्यंत बदल, शेअर बाजारातही घसरण

मुंबई - ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्याच दिवशी सर्वसामान्यांच्या दैनंदिन खर्चावर परिणाम करणारे अनेक बदल लागू झाले आहेत. व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या किमतीत वाढ, एलपीजी सब्सिडीसाठी बायोमेट्रिक ई-केवायसीची अट, इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या किमतीत वाढ आणि डिजिटल पेमेंटशी संबंधित बदलांमुळे ग्राहक व व्यापाऱ्यांच्या खर्चाचे गणित बदलण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, शेअर बाजारातही १ ऑक्टोबर रोजी सुरुवातीच्या व्यवहारात घसरण पाहायला मिळाली.

सेन्सेक्स सुमारे १५० अंकांनी घसरून ७२,३०० च्या आसपास व्यवहार करत होता, तर निफ्टीमध्ये सुमारे ३० अंकांची घट होऊन तो २२,६०० च्या पातळीवर होता. ऑटो आणि मीडिया क्षेत्रातील शेअर्समध्ये विक्रीचा दबाव अधिक दिसून आला.

**मनीव्ह्यूची दमदार बाजारात एंट्री-** डिजिटल लेंडिंग प्लॅटफॉर्म मनीव्ह्यूच्या शेअर्सने शेअर बाजारात दमदार पदार्पण केले. ३४ इश्यू किमतीच्या तुलनेत तब्बल ६१.७६ टक्के वाढीसह कंपनीचे शेअर्स ५५ वर सूचीबद्ध झाले. २४ ते २८ सप्टेंबरदरम्यान खुला असलेला कंपनीचा आयपीओ ९८.४६ पट सब्स्क्राइब झाला होता. संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून या आयपीओला विशेष प्रतिसाद मिळाला असून, त्यांचा हिस्सा २२७ पटांपेक्षा अधिक भरला होता.

**व्यावसायिक गॅस सिलिंडर महाग -** १ ऑक्टोबरपासून व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या किमतीत कंपन्यांनी सुमारे ७० पर्यंत वाढ केली आहे. याचा थेट परिणाम हॉटेल, रेस्टॉरंट, खानावळ आणि केटरिंग व्यवसायावर होण्याची शक्यता आहे. गॅसचा खर्च वाढल्याने चहा, नाश्ता तसेच लग्नसमारंभातील केटरिंगच्या दरांवरही त्याचा परिणाम होऊ शकतो.

**एलपीजी सब्सिडीसाठी बायोमेट्रिक ई-केवायसी आवश्यक -** सब्सिडीच्या दरात एलपीजी सिलिंडर मिळविण्यासाठी बायोमेट्रिक आधार ऑथेंटिकेशन अर्थात इ--/श-घधउ पूर्ण करण्याची अट लागू करण्यात आली आहे. ज्यांचे ई-केवायसी यापूर्वीच पूर्ण झाले आहे, त्यांना नव्या नियमाचा अतिरिक्त परिणाम होणार नाही.

ज्या ग्राहकांनी बायोमेट्रिक पडताळणी पूर्ण केलेली नाही, त्यांना सब्सिडीच्या दराचा लाभ घेता येणार नाही. मात्र, त्यांचे गॅस बुकिंग किंवा सिलिंडरचा पुरवठा बंद होणार नाही. ई-केवायसी पूर्ण केल्यानंतर सब्सिडीचा लाभ पुन्हा मिळू शकतो.

**१५ ऑक्टोबरपासून निवडक UPI व्यवहारांवर व्यापारी शुल्क**

डिजिटल पेमेंट क्षेत्रातही बदल करण्यात आला आहे. १५ ऑक्टोबर २०२६ पासून २,००० पेक्षा अधिक रकमेच्या निवडक व्यापारी णझख व्यवहारांवर व्यापारी सवलत दर लागू होण्याची तरतूद आहे. मात्र, महिन्याला णझखद्वारे १ लाखांपर्यंत व्यवहार स्वीकारणाऱ्या छोट्या व्यापाऱ्यांसाठी व्यवहार विनामूल्य राहणार आहेत. एखाद्या छोट्या व्यापाऱ्याने सलग तीन महिने १ लाखांपेक्षा अधिक णझख पेमेंट स्वीकारले, तर त्याचा मोठ्या व्यापाऱ्यांच्या श्रेणीत समावेश होऊन शुल्क लागू होऊ शकते. व्यक्ती-ते-व्यक्ती णझख व्यवहारांवर या



बदलाचा परिणाम होणार नाही.

**एसी, टीव्ही, फ्रिज, वॉशिंग मशीन महागण्याची शक्यता -** ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातही १ ऑक्टोबरपासून दरवाढीचा परिणाम दिसून येत आहे. एसी, एलईडी टीव्ही, वॉशिंग मशीन आणि फ्रिजच्या किमतीत कंपन्यांकडून सुमारे ३ ते ८ टक्क्यांपर्यंत वाढ केली जात असल्याचे सांगण्यात येत आहे. २०२६ मध्ये या क्षेत्रातील ही तिसरी दरवाढ ठरणार आहे.

तांबे, स्टील, ॲल्युमिनियम आणि कच्च्या तेलाच्या किमतीतील वाढ तसेच चलनातील चढ-उतार यामुळे उत्पादन खर्च वाढल्याचे कंपन्यांचे म्हणणे आहे. मात्र, सणासुदीच्या काळात ग्राहकांना तातडीने मोठी दरवाढ जाणवण्याची शक्यता कमी आहे. वितरक आणि डीलर्सकडे जुन्या दराने खरेदी केलेला सुमारे एक ते दीड महिन्यांचा साठा असल्याने दिवाळीपर्यंत काही इलेक्ट्रॉनिक वस्तू जुन्या किमतीत उपलब्ध राहण्याची शक्यता आहे. एकूणच, ऑक्टोबरच्या सुरुवातीलाच गॅस, डिजिटल व्यवहार आणि ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील बदलांमुळे घरगुती बजेट तसेच व्यापाऱ्यांच्या खर्चावर परिणाम होण्याची शक्यता आहे. दरम्यान, आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या तेलाच्या किमती आणि रुपयाच्या विनिमय दरातील चढ-उतार यांचा परिणाम पेट्रोल-डिझेलच्या किमतींवर होण्याची शक्यता आहे. वाहतूक खर्च वाढल्यास त्याचा अप्रत्यक्ष परिणाम भाजीपाला, किराणा, खाद्यपदार्थ आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या दरांवर होऊ शकतो.

# प्रामाणिकपणाला सलाम ! गहाळ मंगळसूत्र महिलेला परत

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- शहरातील माळीवाडा परिसरात गहाळ झालेले चार ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र नगरपालिका सफाई कामगार महिलेच्या प्रामाणिकपणामुळे पुन्हा मालकिणीच्या ताब्यात मिळाले. संगीता सोमनाथ शिंदे यांनी मंगळसूत्र सापडल्यानंतर ते स्वतःकडे न ठेवता थेट संगमनेर शहर पोलिस ठाण्यात आणून दिल्याने त्यांच्या प्रामाणिकपणाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



माळीवाडा परिसरातील काटे हॉस्पिटलच्या पाठीमागील भागात ऋतुजा गणेश गाडेकर यांचे चार ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र गहाळ झाले होते. त्यांनी परिसरात मंगळसूत्राचा शोध घेतला; मात्र ते मिळून आले नाही. त्यानंतर त्यांनी संगमनेर शहर पोलिस ठाण्यात जाऊन याबाबत माहिती दिली.

पोलिस निरीक्षक समीर बारवकर यांनी घटनेची गांभीर्याने दखल घेत गुन्हे प्रगटीकरण पथकाला मंगळसूत्राचा शोध घेण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार पोलिस पथकाने परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली. सीसीटीव्ही चित्रणाच्या आधारे गहाळ झालेले मंगळसूत्र नगरपालिका सफाई कामगार संगीता सोमनाथ शिंदे यांना सापडल्याचे समोर आले.

दरम्यान, मंगळसूत्र सापडल्यानंतरही संगीता शिंदे यांनी त्यावर कोणताही हक्क न सांगता ते प्रामाणिकपणे संगमनेर शहर पोलिस ठाण्यात जमा केले. पोलिसांनी आवश्यक खातरजमा केल्यानंतर पोलिसांच्या उपस्थितीत हे मंगळसूत्र ऋतुजा गाडेकर यांच्या ताब्यात देण्यात आले. सोन्याचे मंगळसूत्र सापडल्यानंतर ते प्रामाणिकपणे पोलिसांच्या स्वाधीन करणाऱ्या संगीता शिंदे यांच्या कृतीचे पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कौतुक केले. आजच्या काळातही माणुसकी आणि प्रामाणिकपणा जिवंत असल्याचा प्रत्यय या घटनेतून आला आहे.


नोकरीची सुवर्णसंधी

'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'

(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे

पदे: Field Sales Executive
Business Development Manager

कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग

पात्रता

* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक

सुविधा

आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा

संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165


# गांधीवाद ते गांधीगिरी : आपण गांधींना खरेच समजलो का?

आज महात्मा गांधी जयंती. गांधीजींचे विचार कालातीत आहेत. सत्य, अहिंसा, प्रेम, सेवा आणि मानवता यांचा संदेश देणारे त्यांचे विचार आजही सर्वव्यापी आणि शाश्वत आहेत. मात्र, गांधीजींच्या विचारांचा आपण नेमका किती स्वीकार केला आणि त्यांच्या नावाचा वापर किती केला, हा आत्मपरीक्षणाचा विषय आहे.

प्रसिद्ध साहित्यिक शेक्सपियर यांनी म्हटले आहे की, काही माणसे जन्मतःच महान असतात, तर काही माणसे परिस्थितीमुळे मोठी होतात. महात्मा गांधी हे दुसऱ्या प्रकारातील होते. ते उपजत मोठे नव्हते; संघर्ष, अनुभव, आत्मपरीक्षण आणि सत्याच्या मार्गावरून चालत त्यांनी स्वतःला घडविले आणि अखेर एका युगाचे प्रतिनिधित्व करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून जगासमोर उभे राहिले. जपानी बौद्ध भिक्खू फ्युजी यांनी महात्मा गांधींना तीन माकडांची मूर्ती भेट दिली होती. 'वाईट पाहू नका, वाईट ऐकू नका आणि वाईट बोलू नका', असा संदेश देणारी ही तीन माकडे गांधी विचारांचे प्रतीक बनली. मात्र आजच्या काळात त्यात एक चौथे माकड जोडले गेले आहे-मोबाईल! ते सांगते, 'बटन दाबा आणि हवे ते पाहा, हवे ते ऐका आणि हवे ते बोला.' त्यामुळे आपण नेमके कुठे चाललो आहोत, याचा विचार करण्याची वेळ आली आहे. गांधीवाद ते गांधीगिरी हा प्रवास सोपा नाही. गांधींना समजून घेणे अवघड आहे; मात्र त्यांच्यावर नावे ठेवणे अत्यंत सोपे आहे. गांधीवाद हा कोणताही वस्तुरूप विचार नाही, तर ती एक जीवनपद्धती आहे. गांधी हे एका युगाचा चेहरा आहेत.

गांधीजींनी कोणत्याही विशिष्ट 'इझम'ला जन्म दिला नाही. सत्य आणि अहिंसेची ज्योत सतत तेवत राहावी, एवढाच त्यांचा आग्रह होता. गांधीवाद म्हणजे जीवनाकडे पाहण्याचा एक दृष्टिकोन, एक शैली आणि मानवी जीवनातील समस्यांचे निराकरण करण्याची एक पद्धत आहे. सत्याग्रह, अहिंसा, अपरिग्रह, शुचिता आणि विश्वस्त कल्पना ही त्यांच्या विचारधारेची प्रमुख तत्त्वे आहेत.



दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहापासून त्यांनी आत्मबलाची ताकद जगाला दाखवून दिली. स्वदेशीपासून खादीपर्यंत अनेक विधायक कार्यक्रम त्यांनी राबविले. ते म्हणत, 'मी अहिंसक क्रांतीचा कलाकार आहे.' त्यांच्या दृष्टीने सत्य हे सर्व व्रतांचे अधिष्ठान होते. दुसऱ्याच्या जीवनात सहाय्य करणे ही अहिंसा, तर दुसऱ्याच्या जीवनात अडथळा निर्माण करणे ही हिंसा, अशी त्यांची व्यापक व्याख्या होती.

चंपारण सत्याग्रह, असहकार चळवळ, चलेजाव आंदोलन, स्वच्छता व सफाईचे कार्य, आरोग्य, दारूबंदी आणि हरिजन सेवा या गांधीजींच्या विधायक कार्याचा आपण आज अभ्यास केला पाहिजे. गांधीवाद म्हणजे केवळ एखादी विचारसरणी नसून ती जीवन जगण्याची पद्धत आहे. गांधीजींनी पाच आश्रम, अकरा व्रते आणि अठरा विधायक कार्यांची संकल्पना मांडली. सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य, अस्तेय, श्रम, असंग्रह, सर्वधर्मसमभाव, स्वदेशी, अस्पृश्यता निवारण, आस्वाद आदी व्रतांनी त्यांच्या जीवनाला नैतिक अधिष्ठान आणि आत्मिक सामर्थ्य दिले. त्यांनी जगाला शिकविले की, पाशवी शक्तीविरुद्ध आत्मबलाने लढता येते. मानवातील पशुत्वाविरुद्ध मनुष्यत्वाने लढता येते. अन्यायाशी न्यायाने लढले पाहिजे. द्वेषाला प्रेमाने आणि हिंसेला अहिंसेने जिंकता येते. शस्त्र हातात न घेता प्रेम, अहिंसा, सत्य आणि सेवा यांच्या बळावर त्यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध संघर्ष केला. आज भ्रष्टाचार, भेदाभेद, प्रांतवाद, भाषावाद आणि दहशतवादासारख्या समस्यांसमोर उभे राहताना गांधीजींच्या विचारांकडे नव्याने पाहण्याची गरज आहे.

गांधीजींचे मौनही बोलके होते. त्यांच्या उपदेशापेक्षा त्यांच्या उपोषणात अधिक सामर्थ्य होते. गोपाळ कृष्ण गोखले यांनी १९०९ मध्ये गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन करताना त्यांच्या निर्मळता, उदात्तता आणि निर्भयतेचा गौरव केला होता.

आपण गांधीजींचा चरखा घेतला, खादी घेतली; पण त्यामागचा विचार मात्र हरवून बसलो. आचार्य दादा धर्माधिकारी यांनी एका ठिकाणी खादीबाबत मार्मिक भाष्य केले होते-आज सर्वत्र खादी घालण्याची फॅशन झाली आहे; मात्र खादीचे विशिष्ट मूल्य आपण विसरलो आहोत. खादी परिधान करणे म्हणजे केवळ कपडे बदलणे नव्हे, तर जीवनदृष्टी स्वीकारणे होय. चरख्याचा अर्थ आपण कधी कधी फक्त 'चर आणि खा' एवढाच घेतला आहे. 'तूही खा, मीही खातो; आपण दोघे भाऊ मिळून खाऊ', अशी प्रवृत्ती वाढत गेली तर गांधींच्या विचारांचा पराभव होतो. आपण गांधीवादापासून गांधीगिरीपर्यंत आलो; पण गांधींना मात्र समजून घेतले का? हा प्रश्न आज अधिक महत्त्वाचा आहे.

सत्य, अहिंसा आणि स्वदेशी या तत्त्वांकडे आपण डोळेझाक केली. गांधींच्या नावाचा वापर राजकारणासाठी केला; मात्र स्वच्छता, दारूबंदी, आरोग्यसेवा, ग्रामविकास आणि सामाजिक समतेसारख्या त्यांच्या विधायक कार्यांकडे दुर्लक्ष केले. फक्त खादीचे कपडे घालून गांधीवादी होता येत नाही. गांधीवादी होण्यासाठी त्यांच्या विचारांचा आणि आचाराचा स्वीकार करावा लागतो. गांधीजींच्या विचारांमध्ये मानवतावाद आहे. आज महात्मा गांधींचे विचार अनेकदा पुस्तकांच्या पानांपुरते मर्यादित राहिले आहेत. नवीन पिढीला आपण गांधीजी कधी आणि कसे समजावून सांगणार, हा प्रश्न आहे. बाबा आमटे यांनी महात्मा गांधींना 'एका युगाचा चेहरा' म्हटले होते. गांधीजी हे एक कलाकार होते. त्यांनी मिठाच्या एका पुडीला हात घातला आणि ब्रिटिश साम्राज्याला आव्हान दिले. त्यांनी सुतापासून सुरुवात केली आणि स्वराज्याच्या ध्येयापर्यंतचा प्रवास घडवून आणला.

महात्मा गांधींचे महात्म्य केवळ त्यांच्या नावाचा जयघोष करून समजणार नाही. त्यांचे जीवन आणि विचार समजून घ्यावे लागतील. नवीन पिढीपर्यंत गांधी पोहोचवण्यासाठी आजच्या तंत्रज्ञानाचा, संगणकाचा आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा सकारात्मक वापर करता येऊ शकतो.

प्रसिद्ध अणुशास्त्रज्ञ अल्बर्ट आईन्स्टाईन यांनी गांधीजींबद्दल म्हटले होते-

Coming generations will scarcely believe that such a one as this walked the earth in flesh and blood.

म्हणजेच, पुढील पिढ्यांना असा माणूस प्रत्यक्ष पृथ्वीवर चालत होता, यावर विश्वास ठेवणेही कठीण जाईल. आज गरज आहे ती गांधीजींना केवळ पूजण्याची नव्हे, तर समजून घेण्याची. सत्याग्रह आणि उपोषण या शब्दांचा आपण इतका वापर केला आहे की त्यांच्या मूळ आशयाची धार बोथट झाली आहे. गांधीजी समजून घ्यायचे असतील तर त्यांचे साहित्य वाचले पाहिजे. विशेषतः 'सत्याचे प्रयोग' हे आत्मचरित्र वाचले पाहिजे. आज वाचन संस्कृती कमी होत असताना गांधी जयंती हा एक चांगला निमित्तबिंदू ठरू शकतो. विद्यार्थ्यांनी आणि आपण स्वतःनेही काही काळ मोबाईलपासून दूर राहून थोर व्यक्तींची पुस्तके वाचली, तर इतिहास समजेल, विचार समजतील आणि समाजाकडे पाहण्याची दृष्टीही व्यापक होईल. गांधीजींनी सांगितलेला मार्ग आजही आपल्यासमोर आहे-सत्याचा, अहिंसेचा, प्रेमाचा, सेवेचा आणि मानवतेचा. गांधी जयंती केवळ एक दिवस साजरा करण्याचा उत्सव न राहता, गांधी विचारांचे आत्मपरीक्षण करण्याचा दिवस ठरावा. गांधींच्या नावापासून गांधींच्या विचारांपर्यंत आणि गांधीगिरीपासून खऱ्या गांधीवादापर्यंतचा प्रवास आपण केव्हा करणार, हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची गरज आहे.

**प्रा. शशांक गंधे**
संगमनेर, मो. ९८९०१६३६४२

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



## वादळाने पडलेले खांब रात्रीतून उभे

### आ. खताळांच्या सूचनेनंतर महावितरणची कार्यवाही

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील हिवरगाव पावसा, रायतेवाडी, देवगाव, निमगाव टेंभी परिसरात झालेल्या वादळी वाऱ्यामुळे सुमारे ३० ते ३५ वीजखांब उन्मळून पडल्याने तसेच अनेक ठिकाणी वीजवाहिन्या तुटल्याने वीजपुरवठा खंडित झाला होता. त्यामुळे ग्रामस्थ, शेतकरी आणि व्यावसायिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या घटनेची माहिती भाजपचे तालुका उपाध्यक्ष केशव दवंगे यांनी आमदार अमोल खताळ यांना दिल्यानंतर त्यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना तातडीने वीजपुरवठा सुरळीत करण्याच्या सूचना दिल्या.

आमदार खताळ यांच्या सूचनेनंतर महावितरणने तातडीने दुरुस्ती पथके कार्यरत केली. महावितरणचे कार्यकारी अभियंता नारायण सोनवणे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने दुरुस्तीची कामे पूर्ण करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार पडलेले वीजखांब उभे करणे, तुटलेल्या वीजवाहिन्या जोडणे तसेच अन्य तांत्रिक दुरुस्तीची कामे युद्धपातळीवर सुरू करण्यात आली.

महावितरणचे उपकार्यकारी अभियंता रमेश घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सहाय्यक अभियंता शेख यांच्या नेतृत्वाखाली वायरमन पोटे, देवकर, बावणे आणि विशाल रहाणे यांनी रात्रभर अथक परिश्रम घेतले. अवघ्या रात्रीत सुमारे २० ते २५ वीजखांब उभे करून वीजवाहिन्यांची दुरुस्ती करण्यात आली. त्यानंतर परिसरातील खंडित वीजपुरवठा मोठ्या प्रमाणात सुरळीत करण्यात आला.



वादळी वाऱ्यामुळे वीजखांब आणि वाहिन्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने दुरुस्तीचे काम आव्हानात्मक होते. मात्र, महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रात्रंदिवस मेहनत घेत तातडीने वीजपुरवठा पूर्ववत केल्याने ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे. उर्वरित दुरुस्तीची कामेही सुरू असून, येत्या दोन दिवसांत आवश्यक ती सर्व कामे पूर्ण करण्यात येतील, अशी माहिती उपकार्यकारी अभियंता रमेश घुगे यांनी दिली. दरम्यान, वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी तातडीने पाठपुरावा केल्याबद्दल हिवरगाव पावसा, रायतेवाडी व परिसरातील ग्रामस्थांनी आमदार अमोल खताळ यांचे आभार मानले. तसेच प्रतिकूल परिस्थितीत रात्रभर काम करून वीजपुरवठा पूर्ववत करणाऱ्या महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचेही ग्रामस्थांनी कौतुक केले.

## SIR प्रक्रिया थांबवा; वगळलेल्या पात्र मतदारांची नावे पुनर्स्थापित करा

### माकपच्यावतीने राज्यातील २३ जिल्ह्यांत आंदोलन; जिल्हाधिकारी, तहसीलदारांना निवेदने

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरावलोकनाची प्रक्रिया तात्काळ थांबवावी, चुकीच्या पद्धतीने वगळण्यात आलेल्या पात्र मतदारांची नावे पुनर्स्थापित करावीत आणि निवडणूक आयोगाची स्वायत्तता व विश्वासार्हता कायम ठेवावी, या मागण्यांसाठी भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) अर्थात माकपच्या वतीने सोमवारी (दि. ३० सप्टेंबर) महाराष्ट्रातील २३ जिल्ह्यांत तालुका व जिल्हास्तरावर निदर्शने, मोर्चे व आंदोलने करण्यात आली. आंदोलनानंतर जिल्हाधिकारी आणि तहसीलदारांना निवेदने देण्यात आली.

महाराष्ट्रातील SIR प्रक्रियेत यापूर्वीच्या ९ कोटी ७८ लाख ५४ हजार ४९ मतदारांपैकी ७ कोटी ७१ लाख ६५ हजार ५६२ मतदारांची नावे प्रारूप मतदार यादीत समाविष्ट झाली आहेत. मात्र, तब्बल २ कोटी ६ लाख ८८ हजार ४८७ मतदारांची गणनापत्रे उपलब्ध न झाल्याने त्यांची नावे प्रारूप यादीत समाविष्ट झालेली नसल्याचा दावा माकपने केला आहे.

या वगळलेल्या मतदारांमध्ये ७५.५२ लाख 'आढळले नाहीत/गैरहजर', ७६.८० लाख कायमस्वरूपी स्थलांतरित, ३४.८१ लाख मृत आणि १७.६३ लाख दुबार अथवा अन्यत्र नोंद असलेले म्हणून वर्गीकरण करण्यात आले आहे. या आकडेवारीमुळे पात्र मतदारांची नावेही चुकीच्या पद्धतीने वगळली जाण्याची शक्यता निर्माण झाल्याचा आक्षेप माकपने घेतला आहे.

वगळण्यात आलेल्या सर्व प्रकरणांची पारदर्शकपणे फेरतपासणी करावी आणि कोणत्याही पात्र नागरिकाचा मतदानाचा अधिकार हिरावला जाणार नाही, याची हमी निवडणूक आयोगाने द्यावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

दरम्यान, २३ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध झालेल्या वृत्ताचा दाखला देत माकपने निवडणूक आयोगाच्या अंतर्गत कामकाजाबाबतही प्रश्न उपस्थित केले. गेल्या दहा महिन्यांत आयोगातील दोन निवडणूक आयुक्तांनी किमान १४ प्रसंगी आयोगाच्या निर्णयांवर लेखी आक्षेप नोंदवल्याचे त्या वृत्तात नमूद करण्यात आल्याचे माकपने



म्हटले आहे. हे आक्षेप मतदार नोंदणी, मतदारांची नावे वगळणे, मतदार यादीचा प्रवेश आणि डखठ प्रक्रियेशी संबंधित असल्याचा दावा करण्यात आला.

मतदार यादी ही लोकशाही व्यवस्थेतील मूलभूत संस्था असल्याने तिची निर्मिती प्रक्रिया पारदर्शक आणि विकेंद्रित असावी. मतदारांची नावे समाविष्ट करणे किंवा वगळणे ही प्रक्रिया केवळ केंद्रीकृत तांत्रिक व्यवस्थेवर अवलंबून न ठेवता स्थानिक निवडणूक अधिकाऱ्यांना प्रभावी अधिकार देऊन पारदर्शक पद्धतीने राबवावी, अशी भूमिका माकपने मांडली.

माकपच्या प्रमुख मागण्या-

SIR प्रक्रिया तात्काळ थांबवावी. चुकीच्या पद्धतीने वगळलेल्या पात्र नागरिकांची नावे तातडीने पुनर्स्थापित करावीत. प्रत्येक वगळलेल्या मतदाराला दावे-हरकती नोंदविण्याची व निष्पक्ष सुनावणीची प्रभावी संधी द्यावी. निवडणूक आयोगाचे स्वतंत्र व स्वायत्त कामकाज कायम ठेवावे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवावे.

निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीसाठी पंतप्रधान, लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि भारताचे सरन्यायाधीश यांचा समावेश असलेली स्वतंत्र निवड समिती असावी.

मतदानाचा अधिकार हा लोकशाही प्रक्रियेचा केंद्रबिंदू असून, कोणत्याही प्रशासकीय किंवा तांत्रिक प्रक्रियेमुळे पात्र नागरिक मतदानापासून वंचित राहू नये, अशी मागणी माकपचे राज्य सचिव डॉ. अजित नवले यांनी केली. निवडणूक प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास कायम ठेवण्यासाठी पारदर्शकता, स्वायत्तता आणि उत्तरदायित्व आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले. माकपच्या महाराष्ट्र राज्य कमिटीच्या निर्णयानुसार झालेल्या या आंदोलनात २३ जिल्ह्यांतील कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. मतदानाचा अधिकार आणि लोकशाही प्रक्रियेच्या रक्षणासाठी आंदोलनाची मालिका पुढेही सुरू ठेवण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
भव्य मंगळसूत्र महोत्सव
फक्त आपल्या लाडक्या PBM ज्वेलर्स मध्ये
यामध्ये नवनवीन डिझाईन् आणि
व्हरायटीचे मंगळसूत्र त्याच प्रमाणे
जुन्या 22 कॅरेट सोन्याच्या
एक्सचेंज वर 0% घट
अशोक चौक, गुंजेचा हॉस्पिटल समोर, चावडी जवळ, संगमनेर
7599996999/ 8265036807

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
होलसेल बस्ता बांधा मस्त ऑफर मिळतेय जबरदस्त !
FREE हनिमून टूर
बस्ता बांधायला यायचं हं!
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता खरेदीसाठी स्वतंत्र होलसेल विभाग | डायरेक्ट फॅक्टरी ते ग्राहक
संगमनेर (02425) 222226 | अहिल्यानगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132 | श्रीरामपूर (02422) 220090

ADVANCE GOLD -SIP- SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा आणि एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीचे नाते विश्वासाचे धागे

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
कर्ज रक्कम वाढ । कर्ज व्याजदर कमी । कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल.. सेल... सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
शालू | कांजीवरम | सिल्क पैठणी | बनारसी
आकर्षक साड्यांची असंख्य रेंज..
संपर्क :- 8390005001
पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

स्वास्थ्य रक्षणाय रोग परिशमनाय
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
- सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉइंट रिप्लेसमेंट
- अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
- अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25